13 DEC 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशाच्या प्रगतीमध्ये विद्यापीठांनी योगदान देणे आवश्यक

## राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना आता फक्त शिक्षण देऊन चालणार नाही, तर देशाची प्रगती होण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक आणि विद्यापीठांनी योगदान देणे आवश्यक आहे. मानवी कौशल्ये वृद्धिंगत करण्याबरोबरच जागतिक मानांकनात राज्यातील विद्यापीठांचा कसा समावेश होईल हे पाहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी केले.

राजभवन मुंबई येथे राज्यपाल तथा कुलपती बैस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेमध्ये राज्यातील ६२ हून अधिक विविध विद्यापीठांचे कुलगुरू, संस्थांचे प्रमुख सहभागी झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे 'विकसित भारत २०४७ : युवकांचा आवाज' लाँच कार्यक्रमाचे प्रक्षेपण विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये झाले.



**कोल्हापूर : राजभवन मुंबई येथे राज्यपाल तथा कुलपती बैस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यशाळेत बोलताना राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीस पंतप्रधान मोदी यांनी देशभरातील राजभवन येथे आयोजित कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यापीठांचे कुलगुरू, संस्थांचे प्रमुख व प्राध्यापकांना यांना नवी दिल्ली येथून ऑनलाईन माध्यमातून मार्गदर्शन केले.

दरम्यान, कार्यशाळेमध्ये कुलगुरू व संस्था प्रमुखांच्या सात गटांमध्ये चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांची विचारक्षमता वाढविण्यासाठी कोणते उपाय उपयुक्त ठरतील. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठांमार्फत विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या पातळीवर सुरू असलेल्या उपक्रमांबाबत चर्चा झाली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'विकसित भारत'च्या अनुषंगाने विविध उपक्रमांमध्ये युवा पिढीस सहभागी करून घेणे आवश्यक आहे. सक्षम युवकांच्या माध्यमातून देश सक्षम बनेल. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
13 DEC 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशाच्या प्रगतीत विद्यापीठांचे योगदान आवश्यक

## राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

मानवी कौशल्ये वृध्दींगत करण्याबरोबरच जागतिक मानांकनामध्ये राज्यातील विद्यापीठांचा कसा समावेश होईल हे पहावे. विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना आता फक्त शिक्षण देवून चालणार नाही तर देशाची प्रगती झपाट्याने होण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक आणि विद्यापीठांनी मोठ्या प्रमाणात योगदान देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महामहीम राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी केले.

राजभवन मुंबई येथे महामहीम राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. या कार्यशाळेमध्ये महाराष्ट्र राज्यातील ६२ हून अधिक विविध विद्यापीठांचे कुलगुरू, संस्थांचे प्रमुख सहभागी झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे 'विकसित भारत–२०४७ : युवकांचा आवाज' लाँच करण्याच्या कार्यक्रमाचे प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये करण्यात आले होते. पंतप्रधान मोदी यांनी देशभरातील राजभवन येथे आयोजित कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यापीठांचे कुलगुरू, संस्थांचे प्रमुख आणि प्राध्यापकांना यांना नवी दिल्ली येथून ऑनलाईन माध्यमातून संबोधित केले.



**कोल्हापूर : राज्यभरातील विद्यापीठांच्या ऑनलाईन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस.**

कार्यशाळेमध्ये कुलगुरू आणि संस्था प्रमुखांच्या सात गटांमध्ये चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने, विद्यार्थ्यांची विचार क्षमता वाढविण्यासाठी कोणते उपाय उपयुक्त ठरतील. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठांमार्फत विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या पातळीवरील उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विकसित भारतच्या अनुषंगाने विविध उपक्रमांमध्ये युवा पिढीस सहभागी करून घेणे आवश्यक आहे. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
तरूण भारत

# आज विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव

## कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याचं उद्दीष्ट घेऊन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर दरवर्षी 'अविष्कार' हा संशोधन महोत्सव आयोजित करते. आज (दि. १३) विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन केले आहे. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ संभागृहामध्ये सकाळी १०.३० वाजता कुलगुरू डॉ. डि. टी. शिर्के व प्र–कुलगुरू, डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.

विद्यापीठ स्तरीय संशोधन अविष्कार महोत्सव सहभागी विद्यार्थी तीन स्तरांमध्ये वर्गीकृत केले आहेत. पदवी, पदव्युत्तर आणि संशोधक, संशोधन सादरीकरणे मानव्यशस्त्र, भाषा आणि कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा, विज्ञान, कृषी आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान; आणि वैद्यकीय आणि फार्मसी या सहा श्रेर्णीमध्ये असतील. या मध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालये व विभागमधून ४०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विविध विषयातील संशोधक मार्गदर्शक तसेच प्राध्यापक या पोस्टरचे मूल्यांकन करून त्यातील उत्कृष्ट पोस्टर्स निवडतील जे राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेस पाठवले जातील. यातील पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचा पुरस्कार सोहळा सायंकाळी ५.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन भूगोल विभागामार्फत करण्यात येणार आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज आविष्कार संशोधन महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दि.१३ डिसेंबर रोजी यावर्षीच्या विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव आविष्कार २०२३-२४ चे राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू. प्रा. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बुधवारी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालये व विभागामधून ४०० विद्यार्थी महोत्सवात सहभागी होणार आहेत. विविध विषयांतील संशोधक मार्गदर्शक व प्राध्यापक उत्कृष्ट पोस्टर्स निवडतील.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
लोकमत

# विद्यापीठात आज आविष्कार संशोधन महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने शिवाजी विद्यापीठात आज, बुधवारी 'अविष्कार २०२३-२४' या संशोधन महोत्सवाचे भूगोल विभागाच्यावतीने आयोजन केले आहे.

राजमाता जिजाऊ सभागृहात आयोजित महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सकाळी १०:३० वाजता होणार आहे. या महोत्सवात पदवी विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी आणि संशोधक अशा तीन गटांमध्ये विद्यार्थी वर्गीकृत केले आहेत. मानव्यशास्त्र, भाषा आणि कला; वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा; विज्ञान; कृषी आणि पशुसंवर्धन; अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान; आणि वैद्यकीय आणि फार्मसी या सहा श्रेणींमध्ये संशोधन सादरीकरणे असतील. यात विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालये व विभागमधून ४०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विविध विषयांतील संशोधक मार्गदर्शक व प्राध्यापक या पोस्टरचे मूल्यांकन करून त्यातील उत्कृष्ट पोस्टर्स निवडतील. आज बुधवारी सायंकाळी ५.३० वाजता सिनेट सभागृहामध्ये पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण होईल.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात रूपाली पंदूरकर यांच्या नावे मुलींसाठी अभ्यासिका

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात लवकरच मुलींसाठी आणखी एक अभ्यासिका होणार आहे. स्व. रूपाली रामचंद्र पंदूरकर यांच्या नावे त्यांच्या वडिलांनी दिलेल्या ३५ लाख रुपयांच्या देणगीतून ही अभ्यासिका तयार करण्यात येणार आहे. ही अभ्यासिका बांधण्याला विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत परवानगी दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली.

Scanned with OKEN Scanner

13 DEC 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शंभर टक्के उपस्थितीच्या हमीवर 'एलएल.एम.'च्या विद्यार्थांना

# परीक्षेस बसण्यास परवानगी

## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठकीत निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

एलएल.एम.च्या प्रथम आणि द्वितीय वर्षातील विद्यार्थांच्या भवितव्याचा विचार करून पुढील सत्रात शंभर टक्के उपस्थित राहण्याच्या हमीपत्रांवर परीक्षेस बसण्यास परवानगी देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठकीत झाला.

व्यवस्थापन परिषदेची कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी बैठक झाली. यात विविध विषयांवर चर्चा होऊन मान्यता देण्यात आली. विशेष कक्ष स्थायी समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले. अॅड. रूपाली पणदूरकर अभ्यासिका महिला वसतिगृहात करण्यास मान्यता देण्यात



आली. काही महाविद्यालयांच्या नावात बदल करण्याचे मान्य करण्यात आले.

दीक्षांत समारंभातील पारितोषिक संख्या मर्यादित करण्यात आली. कल्याण निधी योजनेचे वेळेत न आलेले २४ प्रस्ताव मंजूर करण्यात आले. तसेच यापुढे वेळेत प्रस्ताव न पाठविणाऱ्या महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाईचा निर्णय झाला. शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर महानगरपालिका यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यास मान्यता

**विद्यार्थांना फायदा होणार**

एलएल.एम.च्या विद्यार्थांना महाविद्यालयामार्फत ७५ टक्के हजेरी न भरल्याने परीक्षेसाठी अपात्र ठरविण्यात आले होते. यासंदर्भात विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी विद्यापीठाने सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी मागणी व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर यांनी ५ डिसेंबर रोजी पत्राद्वारे विद्यापीठाकडे केली होती. त्याअनुषंगाने निर्णय झाल्याने विद्यार्थांना याचा फायदा होणार आहे.

देण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, स्वागत परुळेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. आर. डी. ढमकले आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

13 DEC 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त समारंभ आता दरवर्षी 'केंद्रीय'

## विद्यापीठ करणार पदवी प्रमाणपत्रांचे वितरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ आता दरवर्षी केंद्रीय पद्धतीने विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये होणार आहे. त्यानुसार कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित असलेल्या २७६ महाविद्यालयांतील स्नातकांना सोमवारी (ता. १८) होणाऱ्या ६० व्या दीक्षान्त समारंभाच्या माध्यमातून पदवी प्रदान केली जाणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) निर्देशानुसार सन २०१९ आणि २०२० मध्ये शिवाजी विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यासाठी दीक्षान्त समारंभ घेण्यात आला. त्यावर सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही स्वरूपातील प्रतिक्रिया शिक्षणातील विविध घटकांकडून व्यक्त झाल्या. बहुतांश महाविद्यालयांनी अत्यंत नेटके संयोजन करत, तर काही औपचारिक स्वरूपात या समारंभाचे आयोजन केले. त्यामुळे पूर्वीप्रमाणे विद्यापीठात दीक्षान्त समारंभ आयोजित करण्याची आग्रही मागणी विद्यार्थी, महाविद्यालयांनी केली. त्यावर विद्यापीठाचा विचार सुरू असताना कोरोनाचे संकट निर्माण झाले. त्यामुळे ऑनलाईन स्वरूपात समारंभ घेण्यात आला. कोरोनाच्या प्रादुर्भाव वाढू नये यासाठी दक्षता म्हणून महाविद्यालयांमधील समारंभ रद्द करून केंद्रीय पद्धतीने विद्यापीठात समारंभ झाला. आता त्याच पद्धतीने यंदापासून दरवर्षी समारंभ होणार आहे. त्यामुळे महाविद्यालयांवरील एक जबाबदारी कमी होणार आहे. केंद्रीय समारंभामुळे विद्यार्थ्यांना पदवी मिळाल्याचा विद्यापीठात साजरा करता येणार आहे.

> 'शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ आता दरवर्षी केंद्रीय पद्धतीने होणार आहे. महाविद्यालय पातळीवर त्याचे आयोजन होणार नाही. विद्यापीठाकडून पदवी प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे.
> **- डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

> 'केंद्रीय पद्धतीने दीक्षान्त समारंभ घेण्याचा निर्णय स्वागतार्ह आणि चांगला आहे. त्यामुळे विद्यापीठाची परंपरा जोपासली जाणार आहे.
> **- डॉ. व्ही. एम. पाटील,** सचिव, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटना

### यंदा ४९,४३८ जणांना पदवी

सोमवारी होणाऱ्या दीक्षान्त समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची संख्या ही ४९ हजार ४३८ इतकी आहे. त्यात स्नातकांत मुलींची संख्या २७ हजार ४७५ आहे.

Scanned with OKEN Scanner

13 DEC 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय अर्थव्यवस्थेत सहकाराचे योगदान आवश्यक

## प्रा. डॉ. एम. एस. देशमुख : 'सहकार व्यवस्थापन पदविका' विद्यार्थ्यांना पुस्तक वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आगामी पाच वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या स्थानावर पोहोचवण्यात सहकार क्षेत्रानेही लक्षणीय योगदान देणे महत्त्वाचे आहे; कारण सहकारातून साधल्या जाणाऱ्या विकासाला व प्रगतीला मानवी चेहरा असतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभागाचे अधिष्ठाता व कृषिविषयक अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'सहकार व्यवस्थापन पदविका' अभ्यासक्रमाचे अभ्यासकेंद्र असलेल्या 'दिलासा सामाजिक विश्वस्त संस्था' या अभ्यास केंद्रातील विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वितरण रविवारी (दि. १०) करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. चार्टर्ड अकौंटंट सुनील नागावकर प्रमुख उपस्थित होते.

प्रा. डॉ. देशमुख म्हणाले की, 'भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास होत असताना आवश्यक विकासदर गाठताना तरुणांनी एकत्र येत सहकारी तत्त्वावर 'स्टार्ट अप्स' सुरू करून योगदान दिले पाहिजे. हे घडले तरच विकासाला मानवी चेहरा मिळून देशातील सर्वसामान्य माणसाचे हित साधले जाईल. आज सहकाराचा अभ्यास त्यासाठी अत्यावश्यक बनला आहे.

चार्टर्ड अकौंटंट सुनील नागावकर यांनी सहकारी संस्थांसंदर्भात ऑगस्टमध्ये झालेला मल्टिस्टेट कायदा बदल तसेच अन्य बाबींविषयी माहिती देताना सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण कसे केले जाते याबाबत तपशिलात सांगितले. लेखापरीक्षण करताना कागदोपत्री दिसणाऱ्या गोष्टींपलीकडेही काही बाबी का व कशा जाणून घ्याव्या लागतात याचेही स्पष्टीकरण केले. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. रूपा शहा यांनी केले. विद्यार्थिनी पौर्णिमा देशपांडे हिने आभार मानले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागप्रमुखपदी डॉ. सोनकवडे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागप्रमुख पदाचा कार्यभार सोमवारी प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी माजी विभागप्रमुख प्रा. के. वाय. राजपुरे यांच्याकडून स्वीकारला.

भौतिकशास्त्र विभाग विद्यापीठातील संशोधन व प्रशासनामध्ये अग्रगण्य आहे. आतापर्यंतचा विभागाचा गौरव, कीर्तीला साजेसे काम त्यांच्याकडून व्हावे. विभागाची प्रतिष्ठा अजून वाढावी, अशा अपेक्षा त्यांच्याकडून करण्यात आल्या. केंद्रीय विद्यापीठ, इन्स्टिटयूट ऑफ नॅशनल इम्पोर्टन्स आणि राज्य विद्यापीठातील कामाचा अनुभवाचा फायदा विभाग, विद्यापीठाला चांगला होईल, असे मत सर्वांनी व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
पुढारी

# भारतीय भाषांचे जतन, संवर्धन करणे महत्त्वाचे : डॉ. रघुनाथ कडाकणे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सध्या अनेक भारतीय भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राजाराम महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व नाईट कॉलेज ऑफ आर्टस् व कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यसैनिक सुब्रह्मणिया भारती यांच्या जयंती औचित्याने भारतीय भाषा उत्सवानिमित्त 'भारतीय भाषा' या विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते.

प्रा. डॉ. कडाकणे म्हणाले, भारताचा विविधतेच्या बाबतीत विचार केल्यास निसर्ग समृद्धी, प्रादेशिक समृद्धी, आर्थिक, भाषिक आणि धार्मिक यामध्ये जशी विविधता आहे. तशी भाषेमध्येसुद्धा विविधता आहे. भौगोलिक अभिनिवेश सोडून त्यापुढे गेल्यास फायद्याचे ठरणार आहे. समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. पी. बी. बेळीकट्टी यांनी करून दिली. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. अरुण शिंदे यांनी आभार मानले. यावेळी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् व कॉमर्सचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. जे. फराटे, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, सी. एस. कोतमिरे, नाईट कॉलेज मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. अरुण शिंदे, डॉ. पी. एस. लोंढे, एस. वाय. चोपडे आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
पुढारी

# विद्यापीठातील प्रशासकीय विभाग रविवारी सुरू राहणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षान्त समारंभ दि. १८ रोजी होणार आहे. त्याअनुषंगाने पूर्वतयारीसाठी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय विभाग सुरू राहणार आहेत. दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर १७ डिसेंबरची कार्यालयीन सुट्टी रद्द करण्यात आली आहे. या दिवशी सर्व प्रशासकीय विभाग नियमित वेळेनुसार सुरू राहणार आहेत. या दिवशी पर्यायी सुट्टी लवकरच जाहीर केली जाईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
पुढारी

# नाईट कॉलजमध्ये मराठी विभागातर्फे मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम

कोल्हापूर : नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्सच्या मराठी विभागातर्फे मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २० डिसेंबरपासून एक महिना कालावधीचा सायंकाळी ६ ते ८ या वेळेत अभ्यासक्रम असेल. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने हा अभ्यासक्रम असणार आहे. यात मोडी लिपीचे वाचन व लेखन यांची माहिती दिली जाईल. इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश घेता येईल. इच्छुकांनी अधिक माहिती व नावनोंदणीसाठी दि. २० डिसेंबरपर्यंत मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्र. प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला २,७४५ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला २ हजार ७४५ विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी ११४ विद्यार्थी अनुपस्थित होते.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहे. सोमवारी मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, बीएस्सी., एमएस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), मास्टर ऑफ जर्नालिझम, पीजी डिप्लोपा इन इंटरनॅशनल रिलेशनशिप १५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. आजअखेर १४४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. शिवाजी विद्यापीठाचा ६० वा पदवीदान समारंभ दि.१८ डिसेंबर रोजी होणार असल्याने यादिवशी पूर्वनियोजित परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. यादिवशीच्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
पुढारी

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विविध अभ्यासक्रमांना मान्यता

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्या पार्श्वभूमीवर नवीन अभ्यासक्रमांना मान्यता देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

**विद्या परिषद बैठकीत निर्णय**

विद्या परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यावेळी विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. काही महाविद्यालयांना कायमस्वरूपी संलग्नता देण्याचे दोन प्रस्ताव अमान्य करण्यात आले. यासंदर्भातील जाचक अटी दुरुस्त करून धोरणात्मक निर्णय घेण्याचे ठरले. राज्यस्थान येथील जेजेटीयू विद्यापीठास समकक्षता देण्याबाबत चर्चा झाली. यासंदर्भात नवीन समिती नेमून १४ प्राध्यापकांच्या पीएच.डी.बाबतचा निर्णय पुढील बैठकीत घेण्याचे ठरले. जे. जे. मगदूम इन्स्टिट्यूटला स्वायतत्ता देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. यावेळी डॉ. मंजिरी मोरे-देसाई, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. निशा मुडे-पवार यांच्यासह विद्या परिषद सदस्य उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
पुढारी

# आंतरविभागीय मल्लखांब स्पर्धेला प्रारंभ

**गडहिंग्लज :** गडहिंग्लजमधील शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात आंतरविभागीय मल्लखांब स्पर्धेस प्रारंभ झाला. शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त बीओएस सदस्य बापूसाहेब समलेवाले, सिनेट सदस्य सुजित शेडगे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. एस. एम. कदम अध्यक्षस्थानी होते. निवड समितीचे अध्यक्ष प्रा. अण्णासाहेब पाटील, सदस्य डॉ. सी. एच. गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. जयवंत पाटील यांनी स्वागत केले. क्रीडा विभागप्रमुख डॉ. राहुल मगदूम यांनी प्रास्ताविक केले. सचिव डॉ. अनिल कुराडे, शिवाजी विद्यापीठ क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन मिळाले. यावेळी विविध महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक, खेळाडू उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2023
तरुण भारत

# विद्यापीठात आंतरविभागीय मल्लखांब स्पर्धेचे उद्‌घाटन

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठ आणि शिवराज महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मल्लखांब स्पर्धेला सुरूवात झाली. स्पर्धेचे उद्‌घाटन शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त बापूसाहेब समलेवाले, सिनेट सदस्य सुजित शेडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. कदम होते. आण्णासो पाटील, डॉ. सी. एच. गिरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सुरूवातीस स्वागत प्रा. जयवंत पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर हॉलमध्ये स्पर्धा होणार असून स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना श्री. समलेवाले म्हणाले, खेळाडूंनी खेळातून आपल्या कॉलेजसह देशाचे नाव उज्वल करावे, असे आवाहन केले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनीही मार्गदर्शन केले. स्पर्धा पार पाडण्यासाठी संस्थेचे सचिव डॉ. अनिल कुराडे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी डॉ. राहुल मगदूम यांच्यासह विविध महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक, खेळाडू उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. गौरव पाटील यांनी केले, तर आभार डॉ. गणेश सिंहासने यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner